# खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत
# जाहीर नोटीस

विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे यांचे कार्यालय
पत्ता - १ ला मजला, ए विंग,
जिल्हाधिकारी कार्यालय इमारत,
पुणे ४११ ००१
दि. २८/५/२०१९

क्रमांक - विभूसंअ क्र.१४/एलए- १० /मौ.लोणावळा/आ.क्र.२८/पोलीस स्टेशन/२९२/२०१९

ज्याअर्थी, पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांनी लोणावळा विकास योजनेतील आ.क्रं.२८, लोणावळा शहर पोलीस स्टेशन या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रं.संकीर्ण-०३ /२०१५ /प्र.क्र.३४ /अ-२ दि.१२ मे,२०१५ व दि. ३० सप्टेंबर, २०१५ मधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने महाराष्ट्र शासन, गृह विभाग तर्फे, पोलीस अधिक्षक , पुणे ग्रामीण यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी ,पुणे यांचेकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी ,पुणे यांचे आदेश क्रं.पीएलसी-१/सीआर/०८/२०१९ दिं.१६/०३/२०१९ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी उक्त शासन निर्णय दि.१२ मे,२०१५ व दि. ३० सप्टेंबर, २०१५ आणि तद्अनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रं.एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२,दि.२५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत ;त्याअर्थी , आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार मी, दिलीप घेवारे विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे याद्वारे,

(एक) अनुसूची –एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने महाराष्ट्र शासन, गृह विभाग तर्फे, पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे ; आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी पध्दतीने घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयूल – १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे महाराष्ट्र शासन, गृह विभाग तर्फे, पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे नाव खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरीत्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमती पत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमती पत्रे (विकल्प) विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे/पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांचेकडे दाखल करावेत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमूना विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे/ पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर ,पाषाण रोड,पुणे यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमूना या कार्यालयामार्फत / पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यांत येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यांत आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे/पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यांत आली आहे.

**अनुसूची — एक**

खरेदी दयावयाचा जमिनीचा तपशील

तालुका- मावळ जिल्हा-पुणे

| अ.क्र. | गावाचे नाव | नगर भूमापन क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | मौ.लोणावळा | २०८/अ | २५५९.३५चौ.मी. |
| | | २०९ | ९४०.६५ चौ.मी. |
| | | एकूण | ३५०० चौ.मी. |

दि.२८/५/२०१९

ठिकाण : पुणे

स्वाक्षरी/-
**(दिलीप घेवारे)**
विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे